# <u>जाहीर सुचना</u>

मा.अपर जिल्हाधिकारी,मालेगांव यांनी मौजे दसवेल ता.बागलाण,जि. नाशिक या गावातील गट नं.213 क्षेत्र 7.69हेक्टर क्षेत्रा पैकी 01.48 हेक्टर क्षेत्र या जमीनीस वनसंवर्धन अधिनियम 1980 च्या तरतुदी लागु होतात किंवा कसे ? याबाबत अभिप्राय मागितले आहे.

त्या अनुषंगाने सदर प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी ताहाराबाद(प्रा.) याचे कडील अहवाल तसेच या कार्यालयाचे वनजमीनाची नोंदवही नमुना नं.-1 रजिस्टर तपासुन पाहिले असता सदर अर्जदाराच्या गटाची नोंद वनजमीनाची नोंदवहीत दिसून येत नाही.

तसेच अर्जदाराचा गट नं. 213 सर्व्हे नं.130 असून भूमिअभिलेख, याचे कडील गटस्किमचा एकत्रीकरणाचा उतारा तपासला असता त्यातही वनजमीनीची नोंद दिसुन येत नाही.

त्यासाठी सर्व जनतेस कळविण्यात येते की, वर नमुद मौजे दसवेल ता.बागलाण जि. नाशिक या गावातील गट नं. 213 ही जमीन वनजमीन असल्याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचे लेखी आक्षेप पुराव्यासह खालील पत्त्यावर/इ-मेलव्दारे लेखी स्वरुपात 15 दिवसांचे आंत कळवावे. अन्यथा कोणाचेही आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर या कार्यालयाचा अहवाल मा.जिल्हाधिकारी, मालेगांव यांना सादर केला जाईल याची नोंद घ्यावी.

**पत्ता :- उप-विभागीय वन अधिकारी, मालेगांव यांचे कार्यालय मालेगांव, वन वसाहत, कॅम्प रोड, सिताबाई हॉस्पिटल समोर, मालेगांव** (EMAIL ID -subdfomalegaon@Rediffmail.com)

**मालेगांव**
**दिनांक** 09/09/2016

**उप विभागीय वनअधिकारी**
**मालेगांव**